भाग ५

# मूठभर गोष्टी



## औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

समग्र शिक्षा अभियान-शिक्षण विभाग

# संवाद...

महानगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षकांच्या सर्जनशीलतेला आवाहन करून त्यांच्यातील प्रतिभा कथारूप पुस्तकाच्या निमित्ताने आपल्यासमोर ठेवतांना मला मनस्वी आनंद होत आहे.

कथा या विद्यार्थी व शिक्षकांचे भावविश्व उमलवू शकतात. कथा सांगताना शिक्षक व विद्यार्थी भेद विसरून एकाच भावनिक पातळीवर स्थिरावतात. आनंद, सुख, दु:ख, भीती, त्याग, बंधुभाव, निष्ठा, प्रेम इ. भावना ते एकाचवेळी समरसून अनुभवतात. वर्गाध्यापनाच्या दृष्टीने आपला परंपरेने चालत आलेला हा ठेवा अतिशय महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांचा शब्दसाठा वाढवणे, वाक्यरचना शिकवणे, भावना व्यक्त करणे, श्रवण, संभाषण या कला विकसित करणे यासाठी कथा हे माध्यम मध्यवर्ती भूमिका बजावते.

सर्व शाळा प्रगत करणे व गुणवत्ता विकास करणे हे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. शिक्षकांमधल्या अंत:स्फूर्तीला, नवनिर्माणक्षमतेला नवे क्षितिज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच ज्या शिक्षकांच्या क्षमतेवर गुणवत्तेचा रथ ओढावयाचा आहे ती विकसित करणेही गरजेचे आहे. ही बाब ओळखून म.न.पा. आयुक्त, मा. डॉ. निपुण विनायक तसेच श्रीमती डॉ. निधी विनायक यांच्या प्रेरणेमधून 'मूठभर गोष्टी' हा कथासंग्रहाचा उपक्रम साकार होत आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू भाषेतून कथा लिहिल्या आहेत. शिक्षकदिनी या पुस्तकाचे विमोचन करून सर्व कथालेखक शिक्षकांचा सत्कार करत आहोत. हा आमचा पहिलाच उपक्रम असल्यामुळे आपण निदर्शनास आणून दिलेल्या सूचनांचे भविष्यात स्वागत राहील.

या कामी सहकार्य करणारे साहित्यिक श्रीमती डॉ. लीला शिंदे, प्रा. डॉ. दासू वैद्य, श्री. उद्धव भयवाळ, डॉ. विशाल तायडे, श्री. अबु बकर रहेबर, श्री. संजय कुलकर्णी यांचे विशेष आभार.

**श्रीकांत कुलकर्णी,**
शिक्षणाधिकारी
म.न.पा., औरंगाबाद


**प्रेरणा व संकल्पना**

डॉ. निपुण विनायक, (भा.प्र.से.)
आयुक्त, म.न.पा. औरंगाबाद
डॉ. श्रीमती निधी विनायक

**मुद्रक :**

ड्रीम्स् प्रिंट ॲण्ड पॅक
एम.आय.डी.सी. चिकलठाणा,
औरंगाबाद. मो. 8888888011

**प्रकाशक :**

श्रीकांत कुलकर्णी
शिक्षणाधिकारी,
म.न.पा. औरंगाबाद

**मुखपृष्ठ संकल्पना**

श्री. ज्ञानेश्वर असोलकर
(कलाशिक्षक)
श्री. विनोद भोरे
(कलाशिक्षक)

**मुद्रितशोधन :**

डॉ. नागेश अंकुश

**विशेष साहाय्य :**

ज्ञानदेव सांगळे
स.का.अ.म.न.पा.
संजीव सोनार प्र.सां.अ.

**परीक्षक तथा मार्गदर्शक समिती**

श्रीमती डॉ. लीला शिंदे
प्रा. डॉ. दासू वैद्य
डॉ. विशाल तायडे
श्री. उद्धव भयवाळ
श्री. अबू बकर रहेबर
श्री. संजय कुलकर्णी

# मूठभर गोष्टी

## भाग ५

प्रकाशक


औरंगाबाद महानगरपालिका

शिक्षण विभाग

# अनुक्रमणिका


१. हुशार घोडा ..........१
२. ज्ञानाची किंमत ..........२
३. लोककथा ..........४
४. चिऊताई ..........६
५. टॉफी ..........८
६. परीची इच्छा ..........९
७. धाडसी मुले ..........११
८. ...आणि गौरव अधिकारी झाला ..........१३
९. सत् संगती सदा घडो..........१५
१०. चिंटू माकडाची फजिती ..........१७
११. देण्यात खरा आनंद ..........१९
१२. मैत्रीचे नाते ..........२२
१३. मी नाही उचलणार कचरा ..........२५
१४. कुत्र्याचं पिल्लू ..........२७
१५. थांबला तो संपला ..........२९

# हुशार घोडा



एक घनदाट जंगल होते. जंगलात सिंह, चित्ता, तरस, लांडगा, जिराफ, हत्ती, हरीण, घोडा, कोल्हा, माकडे असे अनेक प्राणी एकत्र रहायचे. दिवसभर खेळायचे, मज्जा, मस्ती करायचे.

सिंहाला मात्र सगळे घाबरायचे. सिंह आला की, पळायचे. लपून बसायला जागा शोधायचे. सिंहाचा दरारा तसा ! पण सिंह आता म्हातारा झाला होता. थोडा पळाला की, थकून जाऊ लागला. शिकार करायलाही आता ताकद उरली नाही. मग पोट कसे भरावे बरं? तो विचार करू लागला. त्याला एक युक्ती सुचली. त्याने सगळ्यांना सांगितले, ''मी आता डॉक्टर झालोय, मी तुमच्यावर इलाज करणार, तुम्हाला औषध देऊन निरोगी करणार. तुमचा चांगला मित्र बनणार.''

सगळ्या प्राण्यांना ते खरच वाटलं, मग आजारी प्राणी निरोगी होण्यासाठी सिंहाकडे जाऊ लागले. प्राण्यांवर इलाज करण्याच्या बहाण्याने सिंह त्यांची शिकार करी. आता सिंहाची मज्जा होऊ लागली. रोज पोटभर शिकार मिळू लागली. पण घोड्याचा काही सिंहावर विश्वास बसेना. त्याने सिंहाची परीक्षा घ्यायचे ठरवले आणि तो दुखण्याचे सोंग करून सिंहाकडे गेला. सिंहाला म्हणाला, सिंह महाराज, '' माझा पाय खूप दुखतोय, त्यात काटा घुसला वाटत.''

सिंहाला वाटले, आयती शिकार हातात आली. आता या घोड्याला खाऊन टाकतो.

घोड्यासोबत गोड गोड बोलत सिंह म्हणाला, ''काळजी करू नको घोडोबा! मी आता तुझा पाय बरा करतो.'' मनातल्या मनात हसून सिंह घोड्याच्या मागच्या पायाकडे वळला अणि त्याच्यावर झडप घालणार तोच घोड्याने एक दणदणीत लाथ सिंहाच्या तोंडावर मारली. सिंहाचे तोंड फुटले, नाक फुटले, दात पडले. सिंह घायाळ झाला. घोड्याने तिथून पळ काढला धावत जाऊन जंगलात गेला. सगळ्यांना सिंहाचा खोटेपणा सांगितला व इतरांचा जीव वाचवला.

**अश्विनी अशोकराव हिवरडे (स.शि.)**
म.न.पा.मा.वि. नारेगाव, औरंगाबाद.

# ज्ञानाची किंमत



धोंडिबा नावाचा एक शेतकरी पेठ नावाच्या गावात राहत होता. अतिशय कंजुष, एकेक पैसा जमा करणे आणि संपत्ती वाढविणे हाच त्याचा छंद. जराही कोठे वायफळ खर्च करायचा नाही असा त्याचा दंडक होता. एकदा त्याचा मुलगा राजू याने एक महागडे पुस्तक विकत घेतले. ही गोष्ट धोंडिबाला समजताच तो भडकला. ''अरे, पैसे कमवायला अक्कल लागते, खर्च करायला लागत नाही. बापाच्या पैशावर महागडी पुस्तके विकत घ्यायला तुम्हाला काय जाते..?! इथे हे चालणार नाही. ''आत्ताच्या आत्ता चालता हो..!''

''बाबा, मी आता लहान नाही. 'घराबाहेर जा...' ही तुमची आज्ञा मानून मी बाहेर पडतो. बघू काय होतंय', असे म्हणून न रागावता राजू घराबाहेर पडला.

काहीतरी करून स्वत:चे अस्तित्व निर्माण करायचे, हा निश्चय करूनच तो बाहेर पडला. आपली काही पुस्तके, नवीन विकत घेतलेले पुस्तकही त्याने सोबत घेतले. गावाबाहेर पडताच जंगल लागले. त्या जंगलात एका झाडाखाली बसून तो नवीन पुस्तक वाचू लागला. बसल्या बैठकीला त्याने ते पुस्तक पूर्ण वाचून काढले. नंतर तो भानावर आला. त्याला थोडीसी भूक लागल्यासारखे वाटले. झाडावर पाहिले तर गोड फळे लागलेली होती. ती काढून त्याने पोटभर खाल्ली. जवळच एक निर्झर वाहत होता. तेथे त्याने स्वच्छ पाणी पिले आणि मोठ्या शहराच्या दिशेने चालू लागला. शहरातील गर्दी, इमारती, गोंगाट, गाड्या पाहून क्षणभर थोडासा सैरभैर झाला. एका ठिकाणी शांत बसून विचार करू लागला.

खिशात पाच-पन्नास रुपये होते. त्याने एक ब्रश आणि एक पॉलिशची डबी घेतली. जवळचे सगळेच पैसे संपले होते. त्यामुळे एक दिवस उपवास घडला. रस्त्याच्या कडेला झाडाखाली एक जागा पक्की केली आणि रोज तिथे बसू लागला. बुटांना पॉलिश करू लागला. फडके म्हणून सदऱ्याच्या टोकाचाच वापर केला, पण गिऱ्हाईकांच्या बुटाची चकचकीत पॉलीश करून देऊ लागला. हळूहळू गिऱ्हाईकं वाढू लागली. मग बाकीच्या वस्तूही घेतल्या.

प्रामाणिकपणे तो आपले काम करू लागला. रात्री तिथेच फुटपाथवर झोपू लागला. एक वेळ खायला काही नसलं तरी चालेल पण रोज पेपर न चुकता वाचत होता. नोकरीची जाहिरात पाहत होता. पैशाची जमवाजमव करून अर्ज भरत होता. गिऱ्हाईक नसले की, अभ्यास करत बसायचा परीक्षा देत होता.

असेच दोन–तीन महिने गेले. त्याच्या परीक्षांचे निकाल येत होते. अभ्यासात हुशार असल्याने तो जवळपास सगळ्याच परीक्षात पास होत होता. त्याचा आत्मविश्वास वाढला होता. पहिल्यांदा एका लिपिकाच्या परीक्षेत तो पात्र ठरला होता. त्याने ती नोकरी स्वीकारली. रहायला जागा मिळाली, जेवण खाण्याची सोय झाली. जिथे पूर्वी काम करत होता त्याच गावात आता नोकरी करू लागला. सोबतच अभ्यासही चालू होताच. त्याने परीक्षा देणे चालूच ठेवले होते. मेहनत करत होता. एका वर्षभरातच त्याच्या कष्टाचे फळ दिसू लागले. तो पूर्व, मुख्य, मुलाखत असे टप्पे पार करत शेवटी कलेक्टर झाला. या सत्काराला त्याच्या आई–वडिलांनाही बोलावले होते. वडील भरल्या नजरेने पाहत होते. त्यांना खूप अभिमान वाटत होता. एका निवांतक्षणी धोंडिबा त्याला म्हणाले ''राजू, अरे हा चमत्कार कसा झाला ?''

राजू उत्तरला '' बाबा हा चमत्कार नाही, तुमचा विरोध असतानाही मी पुस्तके घेऊन वाचन करून जे ज्ञान मिळवले त्याचा हा परिणाम आहे. ही ज्ञानाची किंमत आहे. ती पैशात करता येणार नाही.

वडिलांना त्याचे म्हणणे पटले. त्यांनी शाबासकी देत राजूला आपल्या मिठीत घेतले. वडिलांना राजूचा खूप अभिमान वाटत होता.

**विद्युलता पवार–गोरे (स.शि.)**
म.न.पा.कें.प्रा.व मा. वि. इंदिरानगर, बायजीपुरा,औरंगाबाद.

# लोककथा

नेदरलँड नावाचा एक देश होता. समुद्राच्या अगदी लगत असलेला हा देश समुद्रसपाटीपासून कमी उंचीवर वसलेला आहे. म्हणूनच जमिनीच्या भागात पाणी शिरू नये म्हणून या देशात समुद्राला लागूनच उंच संरक्षक भिंत बांधलेली आहे.

समुद्राला भरती आली किंवा हवामानात बदला झाला तर समुद्राचे पाणी भूक्षेत्रालगत येऊ शकते आणि लोकांना हानी पोहचू शकते असा धोका याठिकाणी उद्‌भवू शकतो. म्हणून या उंच संरक्षक भिंतीला कुठे तडा गेला आहे का ? छिद्र पडले आहे का? याबाबत नागरिक सतत जागरूक असतात. या संरक्षक भिंतीची सतत डागडुजी केली जाते. या ठिकाणी हॅन्स नावाचा एक छोटासा मुलगा राहता होता. एका संध्याकाळी तो आपल्या मित्राला भेटण्यासाठी संरक्षक भिंतीजवळून जात होता. जातानाच त्याला दिसले की, त्या भिंतीला एक छोटेसे छिद्र पडलेले आहे आणि त्यातून पाणी येत आहे. काय करावे त्याला सुचेना. मिनिटभर विचार केला, तरी तो पुढे जाऊ लागला. या रस्त्याने इतर कोणीतरी मोठी व्यक्ती येईल व ते छिद्र बुजवून टाकेल असा विचार त्याने केला.

हॅन्स मित्राकडे गेला थोडा वेळ खेळला. या वेळात भिंतीला पडलेले छिद्र त्याला कायम आठवत राहिले. तो विचार त्याच्या डोक्यातून काही केल्या जाईना. परत घराकडे यायला निघाला, चालत असताना त्याने पुन्हा भिंतीवरील छिद्र कोणी बुजवले का? त्याची डागडुजी केली असेल का? या विचाराने भिंतीजवळ जाऊन पाहू लागला.

जवळ जावून पाहतो तर काय? तेव्हाचे ते छिद्र अजून थोडे मोठे झाले होते. बाहेरील समुद्राचे पाणी आतमध्ये शिरत होते. त्याने जवळ जावून त्या छिद्रात बोट घालून पाहिले तर त्याला दिसले की बोट घातल्याने बाहेरचे पाणी आतमध्ये येणे बंद झाले आहे. मग त्याने ठरवले की, गावातील कोणीतरी मोठी व्यक्ती या रस्त्याने येईपर्यंत आपणच हे पाणी थोपवून धरू. तो तिथे तसाच उभा राहिला. एक तास झाला, दोन तास झाले, तीन तास झाले. त्याला थोडी थोडी भूक लागली होती. झोप येत होती, खूप वेळापासून उभा राहिल्याने पायाला कळ लागली होती. वातावरणात गारवा होता. त्यात पाण्याचा स्पर्श झाल्याने त्याला थंडी वाजून आलेली होती. अंग गारठले होते. पण तरीही तो तसाच उभा राहिला.

इकडे हॅन्सचे आईवडील हॅन्स अजून कसा घरी परतला नाही म्हणून शोधाशोध करू लागले होते. थोड्या वेळातच त्या रस्त्याने त्याला शोधत शोधत त्याचे आईवडील आणि गावातील काही जबाबदार लोक आले. त्यांनी हॅन्सला पाहिले हॅन्स थंडगार पडला होता. त्याला नीट बोलताही येत नव्हते. वडिलांनी त्याचे भिंतीत अडकवलेले बोट काढले. नंतर लोकांनी ताबडतोब उपयुक्त सामानाची जमावजमव केली आणि त्या भिंतीची डागडुजी केली. वडिलांचा उर भरून आलेला होता. आपल्या एवढ्याशा मुलाचे त्यांना खूप कौतुक आणि अभिमान वाटला. त्याला उचलून त्यांनी घरी नेले.

गावात सगळ्यांनी त्याचे खूप कौतुक केले. त्याला शाबासकी दिली. त्याने केलेल्या छोट्याशा प्रसंगावधानाने आज गावातील लोकांचा जीव वाचला होता. त्याबद्दल गावकऱ्यांनी त्याचे आभार व्यक्त केले.

टीप :- (प्रस्तुत कथा ही युरोपीयन लोककथा असून त्या कथेचा स्वैर अनुवाद येथे सादर केलेला आहे.)

विद्युलता पवार-गोरे (स.शि.)
स्वैर अनुवाद
म.न.पा. कें.प्रा.व मा. वि. इंदिरानगर,बायजीपुरा,औरंगाबाद.

# चिऊताई



एक होती चिऊताई. उडण्याची तिला सदा घाई. दूरवर जाई ज्वारीचे दाणे, कधी गव्हाचे दाणे, कधी बाजरीची दाणे, तर कधी जवसाचे दाणे आणून चिमुकल्यांना घास भरवी. चिऊताई खाऊ आणायला गेल्यावर ती चिमुकली पिल्ले घरट्यात खेळायची, गाणी म्हणायची, गोष्ट सांगायची, एकमेकांना सांभाळून घ्यायची.

एकदिवस नेहमी सारखीच चिऊत्ताई खाऊ आणायला बाहेर गेली, दूरवर जाऊन खाऊ शोधू लागली. अचानक काय झाले, जोराचा वारा वाहू लागला. धो–धो पाऊस पडू लागला, चिऊताईला अडथळा झाला. आता उडत जाऊ कशी? चिमुकल्यांना खाऊ आणू कशी? चिऊ ताई निराश झाली. पाऊस थांबण्याची वाट पाहू लागली. पण पाऊस थांबण्याची काही चिन्हे दिसेना. चिऊ ताई विचार करू लागली. असे थांबून चालणार नाही. पिल्ले घरी वाट पाहत असतील. चिऊ ताई इकडे तिकडे पाहू लागली कुठे मदत मिळते का याचा कानोसा घेऊ लागली. इतक्यात चिऊ ताईला मोर दिसला. आपला पिसारा फुलवून पावसात तो नृत्य करत होता. चिऊ ताईला आनंद झाला, तिने मोराला हाक मारली. मोर नाचतच आला आणि म्हणाला, ''काय झालं चिऊताई ? डोळ्यांत का आलं पाणी?'' चिऊताई म्हणाली, ''काय सांगू मोर दादा, पाऊस जोराचा सुरू झाला. भुकेलेली पिल्ले माझी, घरट्यात माझी वाट पाहत असतील.'' मोर म्हणाला, ''थांब जरा, मोरपिसांची छत्री देतो तुला?'' ''अरे वा...! किती छान.'' चिऊ ताई म्हणाली, मोरपिसांची छत्री घेऊन पावसात वाट काढत निघाली. पण पुढे आला ओढा, कसे जावे ओलांडूनी? पंख माझे भिजलेले पावसात उडताही येत नाही. काय बर करावे?''

इतक्यात चिऊ ताईला बेडूक दादा दिसला. मस्त मजेत उड्या मारत होता. चिऊ ताईने त्याला मदत मागितली, ''मला ओढा ओलांडून जायचंय!'' चिऊताई म्हणाली.

''बस माझ्या पाठीवर, तुला ओढ्याच्या पलीकडे सोडतो.'' बेडूक दादा म्हणाला. चिऊताई बेडकाच्या पाठीवर बसली. बेडूक दादाने ओढ्यापलीकडे लांब उडी मारली.

चिऊताईला खूप आनंद झाला. बेडूक दादाला धन्यवाद देऊन चिऊताई घरट्याकडे परतली. पिल्लांनी चिऊ ताईला पाहिले आणि आनंदाने चिवचिवाट करू लागले. चिऊने त्यांना दाणे भरवले आणि कुशीत घेतले.

**अश्विनी अशोकराव हिवरडे (स.शि.)**
म.न.पा.मा.वि. नारेगाव, औरंगाबाद.

# टॉफी



कमळमपूर नावाचे एक गाव होते. त्या गावात गोलू व भोलू दोन मित्र राहत होते. गोलू व भोलूची मैत्री पूर्ण गावाला परिचित होती.

गोलू व भोलू सोबतच शाळेत जायचे. शाळेतील विविध खेळ व उपक्रमांत सहभाग घेत असत. तसेच ते अभ्यासातही हुशार होते.

एकदा त्यांच्या शाळेची सहल प्राणी संग्रहालयात गेली होती. तिथे त्यांच्या शिक्षकांनी विविध प्राणी, झाडे, फुले, पक्षी यांची माहिती दिली. विविध प्राणी, पक्षी बघतांना मुलांमध्ये त्याच्याबद्दल उत्सुकता निर्माण झाली. सहलीतील सर्व मुले प्राण्यांच्या पक्ष्यांच्या हालचालीचे बारकाईने निरीक्षण करत होती. सहलीच्या ठिकाणी गोलू, भोलू व त्याच्या मित्रांनी खूप मजा केली. विविध गाणी, गोष्टी, नृत्य, खेळ, विनोद ह्यामध्ये मुले मग्न झाली होती. दिवसभरातील सहलीच्या मजेशीर, सुखद् आठवणी मनात ठेवून मुले घरी परतली.

एकेदिवशी गोलू, भोलू व त्यांचे मित्र शाळेच्या मैदानावर खेळत होते. गोलू व भोलूने एका झाडाखाली एक छोटेसे कुत्र्याचे पिलाला बसलेले बघितले ते खूपच भुकेले व अशक्त दिसत होते. मैदानावरील इतर मुले त्या कुत्र्याच्या पिलाला दगड मारू लागली. परंतु गोलू व भोलूने त्या मुलांना थांबवले. गोलू व भोलूने त्या पिलाला पाणी पाजले. डब्यातील पोळी दिली. थोड्या वेळाने ते पिलू हळूहळू उभे राहिले.

गोलू व भोलूला ते कुत्र्याचे पिलू रोजच मध्यल्या सुटीत त्या झाडाच्या खाली दिसायला लागले गोलू व भोलू त्या पिलाला रोज पाणी व पोळी, बिस्कीट द्यायचे. त्यामुळे कुत्र्याच्या पिलाची तब्येत ही चांगली झाली. हळू हळू गोलू, भोलू व पिलांची मैत्री झाली. गोलू व भोलूने त्या पिलाचे नाव 'टॉफी' ठेवले

**कल्पना श्याम खामगावकर (काथार) (स.शि.)**
म.न.पा. कें. प्रा. व मा. माध्यमिक विद्यालय, इंदिरानगर, बायजीपुरा, औरंगाबाद.

# परीची इच्छा

परी अतिशय गोड गोबऱ्या गालाची चुणचुणीत मुलगी, घारे घारे डोळे, जणू खरी परीच! छोटी परी बोलायला लागली की नुसते ऐकतच रहावसं वाटायचे. प्रश्न विचारून ती सर्वांना भंडावून सोडायची.

ती रोज आईसोबत बागेत फिरायला जायची. तिथे ती तिच्या मित्रमैत्रिणींसोबत खेळायची. तिने बघितले की, काही मोठी मुले पतंग उडवत आहेत. ते पाहून तिला जरा गंमतच वाटली. काही छोटी मुले फुगे उडवत होती. घरी जाताना तिने पाहिले की, आकाशातून विमान उडत आहे. घरी गेल्यावर ती खिडकीजवळ बसली. तेव्हा तिने बघितले की, झाडावर चिमणी उडत आहे.

थोड्या वेळाने तिच्या आईने टीव्ही चालू केला, तेव्हा टीव्हीवर बालवीर सुरू होते. त्यामध्ये नटखट परी, राणीपरी सर्वजणी उडत होत्या. तेव्हा परीच्या मनात आले की, पतंग, फुगा, चिमण्या, विमान, सगळेजण उडतात. नटखटपरी पण उडते. मी पण आईची लाडकी परी आहे. मी पण उडणार!

ती आईला म्हणाली, ''आई गं! मला पण उडायचयं पतंगासारखं, चिमण्यासारखं, चिमण्यांना पंख असतात म्हणून त्या उडतात, आपण नाही उडू शकत. आई तिला समजावते. पण परी मनात म्हणते. फुग्याला आणि पतंगाला कुठे पंख असतात? तरीदेखील ते उडतातच ना? मग मी पण उडणार.



ती चिमणीकडे जाते. चिमणीला म्हणते, ''चिऊ ताई मला पण उडायचं गं तुझ्यासारख! चिमणी देखील तिला बोलू लागते, ''सोप्प आहे अगदी ! दोन हात असे पसरवायचे

आणि थोडं उंचावरून खाली उडी मारायची बरोबर उडतो आपण''. असे म्हणून चिमणीने फांदीवरून एक भरारी घेतली. झालं! परी घरी आली. पलंगावर उभी राहिली. आपले दोन्ही हात बाजूला केले. पंखासारखे आणि जोरात उडी मारली. ती धपकन् खाली पडली. जोरजोरात रडायला लागली. आई धावत आली बघितले तर मोठे टेंगूळ आले होते. आईने लगेच औषध लावले. तिला विचारले. ''बाळा तू कसं काय पडलीस?''

परी म्हणाली ''आई मी चिऊताईसारखं उडत होते. पण उडी मारल्यावर मी वर न जाता खालीच पडले !'' आणि ती आणखी रडायला लागली. आईने मात्र डोक्याला हात मारून घेतला.

जेव्हा ती सकाळी मला उडायचयं अस म्हणाली तेव्हा आईला वाटले की ती गंमतीत म्हणते ''आई आता घाबरली होती. बाबा आल्यावर जेव्हा त्यांना हे समजलं तेव्हा ते म्हणाले, ''माझ्या परीला उडायचं आहे का? चल मी घेऊन जातो तुला उडायला.'' बाबा परीला घेऊन पॅराशूटमध्ये बसले आणि परीची उडण्याची इच्छा अशाप्रकारे पूर्ण झाली.''

**संगीता भाऊसाहेब खरात (स.शि.)**
म.न.पा.प्रा.शाळा, विटखेडा, औरंगाबाद.

# धाडसी मुले



औरंगाबाद तालुक्यात भिंदोन नावाचं गाव आहे. गावाच्या जवळ दुधना नदी वाहते. गावाच्या सभोवती डोंगर असल्यामुळे नदीला बारा महिने पाणी असते. पावसाळ्यात दुधना नदी दुथडी भरून वाहते. दुधना नदीच्या पलीकडील बाजूला शेती आहे. शेतीत कामासाठी गावातील लोक जातात. असेच एके दिवशी गावातील महिला शेतात कामासाठी गेल्या. ऑगस्ट – सप्टेंबर महिन्यात शेतामध्ये मुगाच्या शेंगा तोडण्याचे काम असते. महिलांनी दिवसभर मुगाच्या शेंगा तोडण्याचे काम केले. दुपारनंतर अचानक पाऊस आला. पाऊस जोरदार आल्यामुळे सर्व महिला गावाच्या दिशेने घरी निघाल्या. नदीजवळ सर्वजण जमा झाले. बहुतांश महिलांकडे छोटीशी मुलं होती नदीला धो–धो पूर आला होता. इकडून तिकडे जाण्याचे कुणाचे धाडस नव्हते. गणेश नावाचा मुलगा पुढे आला. साधारण एकोणवीस – वीस वर्षांचा गणेश असेल. बैलगाडीचा दोरखंड हातात घेऊन तो पाण्यात उतरला. पूर्ण शक्ती लावून गणेशने दोरखंडाची एक बाजू नदीच्या पलीकडे फेकली. पलीकडील लोकांनी दोरखंडाची बाजू झाडाला बांधली गणेशने अलीकडील बाजूला दोरखंडाची एक बाजू बांधली आणि गणेश दोरखंडाला धरून नदीत उतरला. सर्व गाव बघत होते.

गणेशच्या मदतीला संदीप, योगेश, ज्ञानेश्वर, रामेश्वर, कैलास धावून गेले. नदीचे पाणी विक्राळ रूप घेऊन दुथडी भरून धो–धो वाहत होते. नदीच्या पलीकडील एका मुलाला घेवून या धाडसी मुलांनी त्याला बाहेर काढले. नंतर सर्व महिला–पुरुषांना बाहेर काढले. सर्व जणांना आनंद झाला. सर्व गावाला आनंद झाला.

गावातील शाळेत इंगळे सर मुख्याध्यापक होते. भावले सर, गायकवाड सर शिक्षक

होते. गावातील शिक्षकांनी मुलांनी केलेल्या धाडसाबद्दल मुलांचे स्वागत केले. वर्तमानपत्रामध्ये मुलांच्या धाडसाची बातमी आली. गावामध्ये सर्व धाडसी मुलांची धुमधडाक्यात मिरवणूक काढण्यात आली. सर्व गावाला आनंद झाला. ही मुले आज सैनिक, पोलीस होऊन आपल्या भारतमातेचे रक्षण करत आहे. अशा या धाडसी विरांना सलाम !

**भावले भालचंद्र कोंडिराम (स.शि.)**
म.न.पा.प्रा.शाळा, विटखेडा, औरंगाबाद.

# ... आणि गौरव अधिकारी झाला



आज शाळेत बक्षीस समारंभ होता. वर्ग दहावीच्या परीक्षेत प्राविन्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार होणार होता. गौरव आज खुपच खूश होता. कारणही तसेच होते. तो ९७ % मार्क मिळवून शाळेत पहिला आला होता.

त्याचे हे यश कौतुकास्पदच होते. लहानपणीच वडिलांचे छत्र हरवले होते. आईने कष्ट करून लोकांच्या घरी धुणी–भांडी करून त्याला लहानाचे मोठे केले होते. आज तो जो काही आहे तो आईमुळेच. पण एकदा लहानपणी छोटीशी चोरी करताना पकडलेला त्याचे असे झाले की, गौरवला बर्फाचा गोळा खूपच आवडत असे. रोज दुपारी तो गोळेवाला घंटी वाजवत गल्लीतून जायचा तेव्हा गौरव घरातून धावतच यायचा आणि अधाशासारखा गोळ्याकडे पहायचा. लाल, पिवळा, ऑरेंज गोळे पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटायचे पण पैसे नसल्यामुळे तो हिरमुसून घरात जायचा. असे रोजच व्हायचे एक दिवस शेजारचा कुणाल म्हणाला ''चल आपण गोळा खाऊयात माझ्याकडे आहेत पैसे. ''हो नाही करता करता गौरव तयार झाला तसा कुणाल गोळा घेऊन आला. दोघांनी मजेत खाल्ला. तेवढ्यात आई कशी कोण जाणे पण घरी आली. तिने गौरवला गोळा खाताना पाहिले पण ती काही न बोलता घरात गेली. दोन दिवस झाले आई काहीच बोलली नाही. गौरव खूपच बैचेन झाला. ''काय करावे?'' त्याला काहीच सुचत नव्हते. त्याचं जेवणात, अभ्यासात कशात कशातच लक्ष लागत नव्हते. आठ दिवस झाले शेवटी त्याने रात्री आईशी बोलायचे ठरवले. नेहमीप्रमाणे आई कामावरून घरी आली. रात्री जेवणे झाली. सर्व आवरा–आवर झाल्यावर गौरव आईला म्हणाला, ''आई बोल ना गं! काय चुकलं माझं? मला खूप एकटं एकटं वाटतयं गं ! बोल ना गं! ''आणि तो खूप रडू लागला. आईला त्याची अवस्था पाहून खूप दया आली शेवटी आईच ना ती ! तिने त्याला जवळ घेतले

थोड्या वेळाने ती म्हणाली, ''गौरव तू आज पाच रूपये चोरलेस.'' प्रश्न पाच रूपयांचा नाही पण मी रागावले नसते तर तुझी हिंमत वाढली असती. हे बघ बाळ आपण कितीही गरीब असलो तरी मानाने जगायला शीक! अरे कष्टाची भाकरी कधीही चांगलीच. बघ मी तुला सांगितले आता कसे वागायचे हे तू ठरव.

गौरवच्या मनाला खूप लागले. त्याने खूप अभ्यास करून मोठे व्हायचे ठरविले त्याने तेव्हापासून अभ्यासाला सुरुवात केली त्याचेच फळ की, त्याला १० वी त ९७% मार्क पडले.

तेवढ्यात मानसी ओरडली, ''अरे गौरव, तुझे लक्ष कुठे? मॅडम तुझे नाव पुकारताय गौरव बक्षीस घ्यायला स्टेजवर गेला. खाली बसलेल्या आईचे डोळे भरून आले. त्याने आईला स्टेजवर बोलावले तिच्या पायाशी बक्षीस ठेवले आणि म्हणाला, ''आज माझे हे यश फक्त तुझ्यामुळेच. आशीर्वादाचा हात पाठीवर असाच राहू दे. मला खूप खूप मोठ व्हायचंय!'' आईने गौरवला उठवून छातीशी धरले दोघेही डोळ्यातून अश्रू वाहू लागले. सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

आज हाच गौरव वायुसेनेत मोठा अधिकारी होऊन देशाची सेवा करीत आहे.

**क्रांती आनंद देशमुख (स.शि.)**
म.न.पा.प्रा.शाळा, इंदिरानगर, बायजीपुरा, औरंगाबाद.



# सत् संगती सदा घडो

एका गावाबाहेर एक आब्यांचे मोठे झाड होते. त्या झाडाला खूप आंबे येत असत. त्या झाडाची सावली ही रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरूंना गारवा देत असे. हे झाड खूप विचारी होते. ते पिकलेले आंबे स्वत:हून खाली टाकत असे. वाटसरू आंबे गोळा करत तेथेच खात व आंब्याचा मनमुराद आनंद लुटत व घरी घेऊन जात असे.

हे परोपकारी, सात्त्विक गुणांनी युक्त आंब्याचे झाड पण संगतीच्या गुणांचा परिणाम कसा असतो, एके दिवशी कावळा या झाडावर बसला. त्याने टाकलेल्या विष्टेतून पिंपळाच्या बिया या आंब्याच्या झाडाखाली पडल्या. त्यातील एक बी उगवून पिंपळाचे एक झाड हळूहळू वाढू लागले. त्या पिंपळानी आंब्याच्या झाडासोबत मैत्री केली.

याच मैत्रीचा फायदा घेऊन तो पिंपळ आंब्याच्या मनात इतरांबद्दल भरवू लागला. तो म्हणायचा, ''अरे काय तू, कोणीही येतो आणि तुझ्या सावलीत विसावा घेतो तुझे आंबे तुला न विचारता घेऊन जातो आणि ती रस्त्याने जाणारी मुले तर तुला दगडही मारतात. ''मग काय बिघडले?'' आब्यांचे झाड म्हणाले, माझ्या सावलीत जे विसावा घेतात, आराम करतात, त्यामुळे त्यांच्यापेक्षा मला जास्त आनंद होतो. माझे आंबे लोकांसाठीच असतात

आणि लहान मुले मला दगड मारतात. पण त्यांचा हेतू मला दगड मारणं नसून आंबे पाडणे हा असतो. त्यांनी आंबे नेले तर खाऊन त्यांची भूक शांत होणार, त्यांचा आत्मा तृप्त होणार व आब्यांच्या कोया दुसरीकडे फेकल्याने माझा वंश दुसरीकडे वाढणार ना पिंपळा !''

हे ऐकून पिंपळाला आंब्याची कीव वाटली. त्याला त्याचे चांगले विचार आवडले नाहीत. तू असा आहेस तसा आहेस असे त्याने सुरू केले. आंब्याने पिंपळाचे म्हणणे काही लक्षात घेतले नाही, पण पिंपळाने आंब्याला दररोज इतरांबद्दल वाईट सांगायचे सोडले नाही. एके दिवशी पिंपळ आंब्याला म्हणाला, ''या माणसांनी सगळीकडे झाडांची कत्तल सुरू केली आहे. याचा बदला घ्यायला हवा.'' झाडांच्या कत्तलीचा मुद्दा ऐकून आंब्याचे झाड थोडे थबकले.

आणखी काही दिवसांनी पिंपळाचे झाड आंब्याला खोटेच म्हणाले. ''अरे आंब्या तुला कळलं का ? आता माणसे आंब्याच्या झाडांची कत्तल करायला लागले आहेत.''

आता मात्र आंब्याचे झाड निराश झाले, त्याला ही माणसांचा राग यायला लागला. या माणसांना आता धडा शिकवायला पाहिजे म्हणून त्याने आपले मूळ विचार, मूळ गुण विसरून ठरवले की, आपल्या अंगाला आंबे लागूच द्यायचे नाहीत, आपली सगळी पाने गाळून टाकायची मग. आपल्या सावलीत कोणी झोपणार नाही. आपल्याला दगड मारणार नाही. तसेच आंब्याने केले. सगळी पाने वाळून गेली. आंब्याला आंबे लागेनाच. काही दिवसांत आंबा खंगून वाळून गेला. आतापर्यंत आंब्याच्या सावलीमुळे लहान असणारा पिंपळ चांगलाच फोफावला मात्र वाईट संगतीने आंब्याला मरण आले.

**अनिकेत रामदास शिंदे (स.शि.)**
म.न.पा. मा. विद्यालय, इंदिरानगर, बायजीपुरा, औरंगाबाद.

# चिंटू माकडाची फजिती



एक मोठे जंगल होते. त्यात खूप उंच, हिरवीगार, मोठमोठी झाडे होती. त्या जंगलामध्ये अनेक प्रकारचे प्राणी राहत असत. वाघ, सिंह, हत्ती, हरीण, साप, लांडगा, माकड इ. एका झाडावर खूप माकडे राहत असत, लहान , मोठी, म्हातारी, अशी सगळीच माकडे त्या झाडावर राहत होती, त्यामध्ये चिंटू नावाचं माकड खूप हुशार होते; पण त्याला सर्वांना त्रास द्यायची खूप सवय होती. तेथे जवळपास राहणाऱ्या सगळ्यांच्या खूप खोड्या तो काढायचा या झाडावरून त्या झाडावर उड्या मारायचा उगीच झाडाच्या फांद्या, फळे तोडून खाली फेकायचा चिमण्यांची घरटे मोडायचा.

चिंटू माकड राहायचा त्या झाडाच्या जवळच एक आंब्याचे झाड होते आणि त्या आंब्याच्या झाडावर माधमाशांचे एक पोळं होतं. त्या मधमाशा वेगवेगळ्या फुलांतील मध आणून त्या पोळ्यात जमा करत असत. चिंटू एके दिवशी उड्या मारत मारत त्या आंब्याच्या झाडावर गेला. तिथे त्याला मधमाशांचे पोळ दिसले ज्या फांदीवर पोळ होतं. ती फांदी चिंटू जोर–जोरात हलवायला लागला मधमाशा घाबरून उडायला लागल्या त्यातली छोटी मधमाशी त्याला बोलते की आमचे घर पाडू नकोस आम्हाला त्रास देऊ नकोस, पण तो काही ऐकत नाही, त्या मधमाशीला त्याने हाताने पकडले व खाली फेकले. हे बघून सर्व मधमाशांना राग आला. त्या सगळ्या मिळून त्याचा चावा घ्यायला लागल्या. कोणी डोळ्याला, कोणी–

कानाला, कोणी हाताला, कोणी पायाला, चिंटू माकड आता मात्र घाबरले व ते मधमाशांची माफी मागू लागले. मधमाशा काही ऐकत नव्हत्या आणि चिंटू परत परत त्यांची माफी मागत होता. आणि कबूल करत होता की, आता मी कोणाला त्रास देणार नाही. तेव्हा मधमाशा त्याला सोडतात त्या क्षणापासून चिंटूला चांगला धडा मिळाला. आणि तो शहाण्यासारखा वागू लागला.

**सीमा विशाल कदम (स.शि.)**
म.न.पा. प्रा. शाळा, खोकडपुरा, औरंगाबाद.

# देण्यात खरा आनंद

निसर्गाच्या सान्निध्यात डोंगराच्या कुशीत बसलेलं साजापूर नावाचं शे-दीडशे उंबऱ्याचं खेडेगाव. तेथे सदा आणि शिवा नावाचे सख्खे भाऊ राहत असत. दोघे जरी सख्खे भाऊ असले तरी दोघांचाही स्वभाव फारच भिन्न होता. उदा. एखादी म्हातारी आजी जर सदाला म्हणाली की, ''अरे बाळा मला जरा पाणी हापसून देतोस का?'' तर सदा नुसतं पाणीच हापसून नाही देणार तर पाणी तिच्या घरी पोहोच करणार. दुसऱ्यांना सतत मदत करणारा मोठ्यांचा आदर करणारा लहानांशी प्रेमाने वागणारा असा हा सदा.



शिवा मात्र खोड्या करण्यात पटाईत कुणी जर त्याला सांगितेल की, शिवा मला दुकानातून साखर आणून देतोस का? तर तो हो म्हणायचा आणि पैसे घेवून तो पसार व्हायचा ते पुढचे चार-दोन दिवस काही भेटायचा नाही. अतिशय रागीट, संतापी मुलांना दमदाटी करणार असा शिवा.

सदाच्या चांगल्या स्वभावामुळे गावकरी म्हणायचे, ''मुलगा असावा तर सदासारखा'', ऐकून शिवाला संताप यायचा तो सर्वांना जास्तच त्रास द्यायचा तेव्हा लोक म्हणायचे, ''शिवासारखा मुलगा नको रे देवा!'' आपल्या भावाचं असलं वागणं बघून सदालाही खूप वाईट वाटायचे त्याला सुधारण्यासाठी काय करावं हे त्याला कळायचं नाही.

एकदा त्यांच्या घरी मावशी आली. सदाची आणि मावशीची भारी गट्टी जमली. तो मावशीला म्हणाला, ''मावशी शिवाचं काय करावं मला काही कळत नाही आई-बाबांनी त्याला समजावून सांगितले कोंडून ठेवले, मारलेही पण हा काही कोणाचं ऐकत नाही.'' ''मावशी म्हणाली'', ''मी पण बघतेय, तो माझ्याशीही जास्त काही बोलत नाही.'' सदा आणि मावशी मिळून काहीतरी निश्चय करतात. दुसऱ्या दिवशी सकाळी मावशी बघते की,

शिवा ओट्यावर बसलेला आहे आणि एका लहान मुलाला धमकावत आहे... ''ओ ऐ बारक्या जा तुझ्या शेतातून माझ्यासाठी कैऱ्या आण नाहीतर तुझे समोरचे दातच काढून घेईल.'' तो मुलगा बिचारा फारच भेदरला . ''हो'' म्हणत तो तिथून निसटला. तेवढ्यात मावशी शिवाच्याजवळ आली तिला पाहून तो जरा चपापलाच. तो तिथून जाणार, तेवढ्यात ती म्हणाली ''अरे थांब. जरा'' शिवा म्हणला ''मला नाही वेळ मला जायचंय.'' मावशी म्हणाली ''जा रे बाबा, पण बघ तरी माझ्याकडे काय आहे? हिच्याकडे काय असणार असा विचार करून शिवा जरा अनिच्छेनेच थांबला.

मावशीने त्याला गुलाबाच्या फुलांचा गुच्छ दिला. फुलं बघून शिवा क्षणभर सगळंच विसरला. मनाशीच तो पुटपुटला ''किती सुंदर आहेत ही फुल! सुवास तर अप्रतिम! आणि किती डौलदार आहेत हे सर्व!'' तेवढ्यात त्याला फुलाच्या खाली असलेला काटा टोचला. बोटातून रक्त बाहेर आले. ते पाहून त्याला खूपच राग आला. फुलाला असलेले काटे किती वाईट आहेत! ना याला रंग, ना सुवास, त्याचं बोलण ऐकून मावशी त्याला म्हणाली ''शिवा फुलांच्या झाडालाच काटे पण येतात. बघ झाडं काही फुलाला वेगळं आणि काट्याला वेगळं पाणी देतं का?'' वारा काही फुलाला वेगळा आणि काट्याला वेगळा स्पर्श करतो का? नाही ना ? ऊन, वारा, पाऊस सर्वकाही सारखं मिळूनसुद्धा एकाच झाडावर वाढूनदेखील फुलं आणि काट्यात किती फरक आहे..!''

सर्वजण फुलाला प्रेमाने जवळ घेतात. मंगलप्रसंगी फुलांचा वापर करतात काट्याला कुणीतरी विचारतं का? कुणी प्रेमाने जवळ घेतं का? नाही ना.! कारण काट्याचा स्वभाव काटा दुसऱ्यांना दु:ख देतो. फुले मात्र सतत सगळ्यांना आनंद देत स्वत: कोमेजून सगळीकडे सुगंध पसरवतात.

आपलही असंच आहे. आपण काटा व्हायचं की फुले हे आपणच ठरवायचं. तेवढ्यात शिवाचे आई-बाबा आणि सदा तिथे येतात. त्याची आई म्हणते ''शिवा, पोरा काटा होवून दुसऱ्यांना त्रास द्यायचा की चांगुलपणाचा सुगंध पसरवायचा, हे तूच ठरव बाळा''.

बाबा म्हणतात ''तुला सर्वांनी फुलाप्रमाणे जवळ घ्यावं असंच आम्हाला वाटत पोरा

सर्वां च बोलण ऐकून शिवाला खऱ्या अर्थाने स्वत:ची चूक लक्षात आली व त्याने चांगलं वागण्याचा निश्चय केला. सदालादेखील खूप आनंद झाला. त्या दिवसापासून शिवादेखील

सर्वांना मदत करायला लागला. लहान मुलांशी प्रेमाने व मोठ्यांशी आदराने वागायला लागला. आता साजापूर गावातील लोक म्हणतात. ''मुलं असावी तर शिवा आणि सदासारखी''!

**संगीता भाऊसाहेब खरात (स.शि.)**
म.न.पा. प्रा. शा. विटखेडा, औरंगाबाद.

# मैत्रीचे नाते

डोंगराच्या कुशीत वसलेलं, चारीबाजूला हिरवाईने नटलेलं एक गाव होतं. गावात सर्व सुखात आणि आनंदात राहत असत. सर्वजण रोज सकाळी लवकर उठून शेतात काम करत असल्यामुळे गावाच्या आजूबाजूची शेती हिरवाईने नटली होती आणि डोंगराजवळील जंगलही!

गावात एकच शाळा होती त्यामुळे गावातील सर्व मुले आणि मुली त्याच शाळेत शिकत असत एक दिवस शाळेतील मॅडमनी सर्व मुलांना मैदानावर नेऊन प्राण्यांविषयी, पक्ष्यांविषयी गोष्टी सांगितल्या आणि म्हणाल्या की, पक्ष्यांना व प्राण्यांना कधीही मारायचे नसते. ते आपले खूप चांगले मित्र असतात.

मॅडमनेही मुलांना विचारले ''मुलांनो, आवडली का गोष्ट?''

सर्व मुले मोठ्याने ओरडू लागली ''हो..! हो..! हो..!'' पण सोहम काही विचार करत होता. मॅडम म्हणाल्या '' सोहम काय झाले तुला? नाही का आवडली गोष्ट?'' नाही मॅडम, ''मला गोष्ट खूप सुंदर वाटली, पण जंगलातील सर्व प्राणी आपले मित्र असतात का?''मॅडम म्हणाल्या, ''काही हिंस्र प्राणी शिकारी असतात. ते स्वत:ला अन्न मिळवण्यासाठी शिकार करतात. पण तरीही सर्वच आपले मित्र असतात.''

''मॅडम, आपल्या गावाजवळील जंगलात शिकारी प्राणी आहे का?'' प्राची म्हणाली.

मॅडम म्हणाल्या, ''लांडगे व कोल्हे आहेत, पण त्यांचा जास्त धोका नसतो. बाकी वाघ,



सिंह हे आपल्या जंगलात नाहीत.''

''मॅडम, आपल्या जंगलात कोणकोणते प्राणी आहे'' जयेश म्हणाला

''ससा, हरीण, मोर, पोपट, कबुतर, माकड आणि असे खूप प्राणी आपल्या जंगलात आहेत.''

सर्वजण शांत झाले, तेवढ्यात मधली सुट्टी झाली.

सोहम, प्राची व जयेश यांचे लक्ष जेवणात लागेना, सर्व जण जंगलातील प्राण्याविषयी बोलत होते. तेवढ्यात जयेश म्हणला. ''आपण जाऊया का जंगलात प्राणी बघायला ?''

सोहम ''हो'' म्हणाला पण प्राची घाबरून म्हणाली, ''नको, नको, लांडगा आला तर तो आपल्या सर्वांना खाऊन टाकेल.''

''अगं प्राची, घाबरू नको. आपण काठी घेऊन जाऊ ना'' जयेश म्हणाला.

प्राची गप्प बसली सोहम म्हणाला,'' उद्या शनिवार आहे. दुपारी शाळा सुटली की, आपण जंगलात जाऊ आणि प्राणी पाहू आपण कोणालाही सांगायचे नाही.''

'' आपण प्राणी पाहून लगेच येऊ हं. जास्त वेळ नाही थांबायचे.'' प्राची म्हणाली

तिघांनीही ठरवले आणि ते घरी गेले.

दुसऱ्या दिवशी शाळा सुटल्यावर ते जंगलात गेले. हिरवीगार वनराई पाहताना पक्ष्यांचे आवाज ऐकू येऊ लागले.

पुढे काही अंतर गेल्यावर त्यांना मोर दिसला.

प्राची मध्येच म्हणायची, ''ए चला ना ! आता घराकडे'' दोघेही तिच्याकडे रागाने पहायचे.

काही क्षणात त्यांना जास्त हालचाल झाल्याचे लक्षात आले ते तिघेही झाडामागे लपले समोर पाहतात तर काय ? काही लोक हातात काठ्या, कुऱ्हाडी, जाळे घेऊन जाताना दिसतात ते तिघेही गुपचुप जंगलातून वापस घरी आले.

सोहम हुशार होता तो बैचेन झाला होता. ''आई वडील शेतातून घरी आल्यावर तो आईला विचारू लागला आई जंगलात माणसे काठ्या, कुऱ्हाडी घेऊन कशाला जातात ग ?''

बाबा म्हणाले, ''तू कुठे पाहिलेस अशी माणसे ?''

सोहम म्हणाला, ''मी सांगितले तर तुम्ही माझ्यावर रागवाल.''

बाबा म्हणाले, ''सांग, मी नाही रागवणार.''

सोहम शांतच होता.

इतक्यात प्राची व जयेश आले ते म्हणाले, ''आम्ही सांगतो.
आणि तिघेही बोलू लागले.
''काल आमच्या मॅडमनी आम्हाला सांगितलं की, जंगली प्राणीही आपले मित्रच असतात ते ऐकून मी, प्राची आणि जयेश जंगलात गेलो.''
खूप प्राणी व पक्षी पाहिले.
पण अचानक आम्हाला काठ्या, कुऱ्हाडी, जाळे घेतलेली माणसे दिसली.
त्यांना पाहून आम्ही घाबरून पळून आलो.
बाबा म्हणाले, ''अरे, ते शिकार करणारे शिकारी आहेत.
ते प्राण्यांना मारतात त्यांचे कातडे, मासं, दात, नखे इ. विकतात.''
हे ऐकून
सोहम खूप नाराज व उदास झाला. त्याला ते आवडले नाही
तो म्हणाला ''बाबा त्यांना आपण रोखू शकत नाही का?''
बाबा म्हणाले, ''ही बातमी आपण गावच्या पोलीस पाटील यांना सांगू चल..''
गावातील पोलीस पाटील, गावकरी, सोहम, प्राची आणि जयेश
यांनी पोलिसांच्या जवळ जाऊन सर्व हकीकत सांगितली.
मग शिकारी लोकांना पकडण्यासाठी एक योजना आखली गेली. त्या योजनेप्रमाणे शिकारी लोकांना पोलिसांनी पकडले. शिकारी लोकांना पकडण्याचे श्रेय मुलांना मिळाले.
शूर मुलांचे कौतुक मा. कलेक्टर साहेब यांनी स्वातंत्र्यदिनी बक्षीस आणि शौर्यपदक देऊन केले.

**सीमा विजय कणे (स.शि.)**
म.न.पा. प्रा. शा. मिटमिटा, औरंगाबाद.

# मी नाही उचलणार कचरा

रस्त्यावरील कचरा साफ करण्याची जबाबदारी फक्त सफाई कामगारांचीच आहे. समीरच्या या बोलण्याने आम्ही क्षणभर अवाक्च राहिलो. मैत्रिणींसोबतचा कचऱ्याचा विषय थांबवत ती विचारांच्या वेगळ्याच जगात हरवली.

हल्ली समीर हट्टी झाला होता. कोणतीही गोष्ट पाहिजे, रोहनच्या वाढदिवसाला मिळालेली कार पाहून माझी कार मित्राच्या कारपेक्षा मोठी हवी, म्हणून सगळी खेळण्याची दुकाने पालथी घातली. सुरवातील बालहट्ट म्हणून पुरविलेल्या गोष्टी आज भयाण वाटू लागल्या होत्या. समीरनं नीट वागवं असं आईला वाटत होतं. आईच्या डोक्यात कल्पना सुचली.

''समीर, ऐ समीर, अरे उठ बाळा, शाळेची वेळ-- होत आली.''

''आई, आज मी शाळेत नाही जाणार.'' समीरचे हे वाक्य ऐकल्यावर, नित्यनियमाने बाबा काहीतरी अमिष दाखवून त्याला उठवत, व वेळ-निभावून नेत मात्र बाबा त्यांच्याच ऑफिसच्या तयारीत होते. आईचा सततचा सुचनांचा पाढाही ऐकू येत नाही, हे पाहून समीर अवाक् होवून उठला. त्याला वाटले आई उशीर झाला, म्हणून रागवेल मात्र आज त्याच्या अपेक्षेप्रमाणे काही घडत नव्हतं. आईनं अगदी आनंदाने समीरला म्हटले, ''नाही जायचे ना शाळेत, नको जाऊस आपण तयार होऊन बाहेर जाऊया.''

समीरला आनंद झाला. वेळ-न दवडता त्याला तो तयार झाला. त्याला घेऊन



त्यातून १०० रु. कमावले तर रोज दोन तास व्हिडिओ गेम खेळायला मिळेल.

समीरला वाटले कायम आपल्या मनासारखे होणार म्हटल्यावर काय हकरत आहे. आणि तो कामाला लागला. सुरुवातीला प्लास्टिक, खिळे सापडले नंतर मात्र कचऱ्याच्या दुर्गंधीने एकत्र कचऱ्यातील खरकटे व त्यातील प्लास्टिक वेगळे करताना त्याला मळमळायला लागले. आई हे सगळं पाहत होती. जमा झालेल्या प्लास्टिक विकून पैसे घेतले. फक्त वीस रूपये रस्त्यावरील पिझ्झा शॉप पाहून खाण्याचा मोह झाला. परंतु जवळ फक्त वीस रूपये होते. तेव्हा समीरचे डोळे पाण्याने डबडबले. तसाच तो परत कामाला लागला. संध्याकाळपर्यंत काम केल्यावर पैसे हातात आले पन्नास रुपये. आई म्हणाली,'' चल समीर, आता घरी नेहमी कारमधून जाणाऱ्या समीरला आज दिवसभर मेहनत करूनही पायी घरी जावे लागले. आईने समीरला हात-पाय स्वच्छ धुऊन जेवायला बोलावले. जेवताना व नंतरही एक अक्षरही न बोलता समीर झोपला व सकाळी लवकर उठून शाळेसाठी तयार झाला. शाळेत गेल्यानंतर मॅडमला विनंती करून त्याने आपला अनुभव वर्गमित्रांना सांगितला व त्याच दिवसापासून कचरा वर्गीकरण, कचरा व्यवस्थापन याबाबत प्रत्यक्ष कृती सुरू केली. घरी आल्यावर समीरच्या वागण्यातील बदल लगेचच जाणवला.

रोज हट्टाने वागणारा, इतरांच्या मेहनतीची कदर न करणाऱ्या या समीरचे आजचे हे रूप पाहून आईला सहजच समीरचे वाक्य आठवले. रस्त्यावरील कचरा साफ करण्याची जबाबदारी फक्त सफाई कामगारांचीच !

**रूपाली योगेश ताठे (स.शि.)**
म.न.पा.प्रा.शा. कैलासनगर, औरंगाबाद.

# कुत्र्याचं पिलू



पावसाळ्याचे दिवस होते. जमिनीने निसर्गाकडून मिळालेला हिरवा शालू पांघरलेला होता. गाव काय आणि शहर काय सर्वच कसे हिरवाईने नटलेले होते. विदेशी पर्यटकांची ये-जा आमच्या जिल्ह्यात खूप वाढली. कारण जगप्रसिद्ध वेरूळ लेणी, अजिंठा लेणी, बिबिका मकबरा आणि देवगिरी किल्ला हे आणि असे कितीतरी प्रसिद्ध पर्यटनस्थळे इथे आहेत.

तुम्हाला सर्वांना कळलंच असेल की, आम्ही औरंगाबाद या शहर आणि जिल्ह्याबद्दल बोलत आहोत. अशा आमच्या शहरातील एक, भागातील 'निसर्ग' या नावाच्या उंच इमारतीमध्ये आम्ही राहतो. आमच्या औरंगाबाद शहरात पण पाऊस चालूच होता. सगळीकडे पावसाचा जोर वाढला होता. आमच्या बिल्डिंगसमोर एका गाडीच्या खाली एक कुत्र्याचे लहान पिल्लू आडोसा घेऊन बसले होते. मी आमच्या गॅलरीमधून त्या पिलाची धडपड पाहत होतो. इतक्यात गाडीच्या ड्रायव्हरने कुत्र्याच्या पिल्लाला हाकलून गाडी पुढे नेली.

आता पिल्लाला पावसांपासून संरक्षण हवे होते. ते थेट आमच्या गेटमधून आत आले आणि पार्किंगमध्ये बसले. मी कापड घेवून पळतच पायऱ्यांवरून खाली उतरलो आणि त्याला जवळ घेऊन कपड्याने पुसले. ते थंडीने थरथरत होते. आम्हाला आमच्या सरांनी सांगितले की, प्राण्यांवर प्रेम करावे त्याची खूप काळजी घ्यावी. तेवढ्यात आमच्या सोसायटीच्या अध्यक्ष काकांना ते कुत्र्याचे पिल्लू दिसले व त्यांना खूप राग आला. त्यांनी वॉचमनला बोलावून सांगितले की, ''हे कुत्र्याचे पिल्लू इथूनं बाहेर फेक आणि यानंतर मला एकही भटके

कुत्रे सोसायटीमध्ये दिसायला नको.'' मला अध्यक्ष काकांचा राग आला, पण लहान असल्याने काही करता आले नाही.

असाच दोन अडीच वर्षाचा काळ निघून गेला. आम्ही थोडे मोठे झालो होतो. खेळायला नेहमी बाहेर ग्राउंडवर असायचो आणि ते कुत्र्याचे पिल्लूही आता मोठे झाले होते. पण ते नेहमी माझ्या अवतीभोवती असायचे. त्याला अजूनही तो प्रसंग आठवत असावा. मी त्याला नेहमी काहीतरी खायला देत असायचो. ते ही आमच्या सोसायटीच्या गेटवरच असायचे. मी आलो की, माझ्या सोबत रहायचे जणू आम्ही एकमेकांचे जिवलग मित्र.

नवरात्रीमध्ये एक दिवस सोसायटीतील सर्व जण दांडिया खेळून खेळून रात्री खूप उशिरा झोपी गेले आणि त्याच संधीचा फायदा घेऊन काही चोर चोरी करण्याच्या हेतूने पाठीमागील भिंतीवरून आत शिरले. सर्वात आधी कुत्र्याला कळले आणि कुत्र्याने भुंकायला सुरुवात केली तो काही थांबेना

कुत्र्याच्या ओरडण्याचा आवाज ऐकून वॉचमन त्याला हाकलून देऊ लागला. पण कुत्र्याचे एकाच ठिकाणी पाहून भुकंने काही केल्या थांबेना. वॉचमनला संशय आला. त्याने अध्यक्ष काकांना फोन करून सांगितले. आम्ही ही जागे झालोच होतो. काकांनी पोलिसांना फोन केला. पोलीसांची गाडी येताच चोर पळू लागले. पण पोलिसांनी पाठलाग करून चोरांना पकडले. सर्वांना आनंद झाला. अध्यक्षकाकांनी वॉचमनला विचारलं, तर त्यांनी सांगितले की, आपण कुत्र्यामुळे वाचलो.

हेच ते कुत्र्याचे पिल्लू होते जे अध्यक्ष काकांनी वॉचमनला फेकायला सांगितले होते. याची जाणीव आम्हाला झाली आणि काकांनाही!

# थांबला तो संपला

एकदा एक तरुण शेतकरी डोंगरावरच्या देवाच्या दर्शनासाठी निघाला होता. डोंगर त्याच्या खेड्यापासून तसा फार लांब नव्हता. दिवसभराचे काम संपवून त्याने भाकरीचं गाठोड बांधून घेतलं. एका मित्राकडून कंदील उसना घेऊन तो डोंगराच्या दिशेने निघाला.

रात्रीच गावाची सीमा ओलांडून डोंगराच्या पायथ्याशी जाऊन थांबला. रात्र अमावस्येची गडद अंधाराची होती. हातात कंदील होता, पण त्याचा प्रकाश तो किती? जेमतेम दहा पावले जाता येईल एवढाच ! अशा परिस्थितीत तो मोठा डोंगर कसा बरं चढायचा ? किऽऽ र्ऽऽ र्र अंधारात एवढासा कंदील घेऊन चढणे वेडेपणाचे होईल, असा विचार त्याने केला आणि मिणमिणता कंदील घेऊन उजाडाची वाट पाहत तो पायथ्याशी बसून राहिला. तेवढ्यात कुणाच्या तरी पावलांची चाहूल लागली तसा शेतकरी अंधारात डोळे ताणून पाहू लागला.



तेवढ्यात त्याच्या कानावर आवाज आला. ''राम राम पाव्हणं का असं बसलातं?'' म्हातारा आवाज होता. शेतकऱ्याने पाहिले, तो म्हातारा त्याच्याच दिशेने येत होता. त्याच्या हातात एक लहान कंदील होता. शेतकरी म्हणाला, ''राम, राम, बाबा. उजाडायची वाट पाहतोय, म्हणजे डोंगर चढून दर्शनाला देवळात जाईन''.

म्हातारा हसला... ''अरे जर डोंगर चढायचं ठरवलं आहे तर मग उजाडायची वाट का पाहतोस? कंदील तर आहे की, तुझ्याकडे, मग कशासाठी इथं पायथ्याशी अडू बसला आहेस?''

कंदील केवढासा ! अहो कसंबसं आठ–दहा पावलं पुढचं फक्त दिसतंय त्याच्या प्रकाशात'' तरूण शेतकरी म्हणाला. म्हातारा हसायला लागला आणि म्हणाला, ''अरे, तू पहिली दहा पावलं तरी टाक जितकं तुला दिसेल तेवढा पुढे जा. जसजसा चालायला लागशील तसे तुला पुढचे दिसायला लागेल. फक्त एक पाऊल टाकण्याएवढा जरी प्रकाश असला तरी त्या एकेका पावलाने पृथ्वीलाही प्रदक्षिणा घालता येते''. म्हाताऱ्याचं बोलणं शेतकऱ्याला पटलं तो उठला आणि कंदिलाच्या प्रकाशात चालायला लागला. सूर्योदयापूर्वी देवळात जाऊन पोहचलासुद्धा !

**सुरेखा सुधीर भालेराव (स.शि.)**
म.न.पा.कें.प्रा.शा. सिडको एन–७, औरंगाबाद.

# माझ्या स्वप्नातील औरंगाबाद शहर





# मूठभर गोष्टी

**औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद**

**समग्र शिक्षा अभियान-शिक्षण विभाग**